# मुक्तेश्वरकृत नारदनिती मधील विविध पैलू

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव
इमेल - bdigole007@gmail.com

मुक्तेश्वरकृत नारदनीती हा विषय मुक्तेश्वराच्या सभापर्वाचा एक भाग आहे. मुक्तेश्वराने समग्र महाभारताची १८ पर्व लिहिली आहेत असे म्हटले जाते. पण प्रत्यक्षात मात्र पाचच पर्वे (आदिपर्व, सभापर्व, वनपर्व, विराटपर्व व सौप्तिक पर्व) उपलब्ध आहेत. त्यापैकी सभापर्वातही नारदनीती आली आहे. सभापर्वाच्या तिस-या अध्यायात नारदाने धर्मराजास जे राजधर्माचे निरूपण केले त्यास नारदनीती म्हणतात. महाभारतात नारदनीती, विदुरनीती (उदयोगपर्व), कृष्णनिती (भिष्मपर्व) आणि भिष्मनीती (शांतीपर्व) अशा प्रकारच्या नीती आल्या आहेत. अर्थात निती या शब्दाचा येथे व्यापक अर्थ होता खरा धर्म कोणता व खोटा धर्म कोणता माणसाच्या जगण्याचे उद्दीष्ट काय माणसाच्या वाटयाला आलेली भूमिका कशी पार पाडावी जीवनात चांगले काय व वाईट काय याचे ज्ञान म्हणजे निती असा महाभारतातील नितीचा अर्थ होय. कविवर्य मुक्तेश्वर इ.स. १५७४ ते इ.स. १६६० हा मराठीतील प्रसिध्द आख्यान कवी होय. आतापर्यंत मराठी कविता अध्यात्म, भक्ती, परमेश्वर प्राप्ती यांना केंद्रबिंदू मानून लिहीली गेली. ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु, एकनाथी भागवत इ. ग्रंथ भक्ती, अध्यात्म या विषयाचाच विचार करणारे होते. पण मुक्तेश्वराने आपल्या काव्याने हे वळण बदलून टाकले. जीवनातील सौंदर्य, पुरूषार्थ, प्रेम, माणसामाणसातील संघर्ष, माणूस ज्या निसर्गाच्या सहवासात राहतो तो निसर्ग कवीने आपल्या काव्यात आणला. मुक्तश्वराने महाभारतावर रचना केली. याचा अर्थ महाभारतातील भाषांतर केले नाही, तर महाभारताचे कथासूत्र घेऊन त्यावर स्वत:च्या प्रतिभेने मुक्तेश्वराने स्वतंत्र निर्मिती केली स्वत:चा कल्पनाविलास, अलंकार, रचना, सुंदर निसर्गवर्णने, स्त्री देहाची सुंदर वर्णने, पराक्रमाची वर्णने, स्वभाववैशिष्टये ही मुक्तेश्वराच्या रचनेची स्वतंत्र वैशिष्टये आहेत. महाभारतातील कथा हे एक निमित्त आहे. त्या निमित्ताने कवीने स्वतंत्र निर्मिती केली आहे. मराठीत प्रथमच ललीत लेखनाची परंपरा मुक्तेश्वरांनी निर्माण केली. मराठीत

आख्यानकाव्याचे महत्वाचे दोन प्रवाह आहेत. पुराण कथांच्या आधारे लोकांच्या मनात भक्ती, ज्ञान, निती, वैराग्य, धर्मज्ञान, व्यवहारज्ञान यांच्या जाणिवा निर्माण व्हाव्यात या उद्देशाने कांही कवींनी आख्यानरचना केली. त्यात संत एकनाथासारखे आख्यान कवी आहेत. जसे नाथांचे भावार्थ रामायण या उद्देशाने लिहिले. त्यात पदोपदी अध्यात्म आणि भक्ती यांचे निरूपण केलेले असते. नाथांच्या पूर्वी संत नामदेव, संत जनाबाई यांनी जी पौराणिक आख्याने लिहिली. तिचे स्वरूप असे भक्तिकाव्यासारखे होते. अशा काव्याची भाषा सोपी व सुलभ असते. थोडेसे मनोरंजन व थोडासा बोध करत करत कथा सांगीतली जाते अशा काव्यात कल्पनाविलास साधा व सोपा असतो. आख्यान काव्याचा दुसरा प्रवाह कवीवर्य मुक्तेश्वर यांनी समृध्द केला आहे. मुक्तेश्वरासमोर भक्ती व अध्यात्म यांचे निरूपण करणे हे उद्दिष्ट नव्हते. याचा अर्थ मुक्तेश्वर नास्तिक व पाखंडी होता असे मूळीच नाही. प्रसिध्द संत एकनाथमहाराज यांच्या मुलीचा मुलगा मुक्तेश्वर होय. मुक्तेश्वरांचे बालपण एकनाथांच्याच घरी गेले. त्यामुळे भक्तिचा संस्कार मुक्तेश्वरावर जरूर होता. तो स्वत: दत्तभक्त होता. म्हणूनच महाभारताच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी लीलाविश्वंभर दत्तात्रयाचे एक नाव यांचा उल्लेख केला आहे. असे असले तरी मुक्तश्वराने आख्यान काव्याची वेगळी वाट निर्माण केली. जीवनाच्या अनेक अंगाचे रसरसलेले चित्रण मुक्तेश्वरांनी केले आहे. ऐहिक सुख व ते मिळवण्याची धडपड करणारी पात्रे मुक्तेश्वरांनी महाभारताच्या अंगाने चित्रित केले आहे. मुक्तेश्वर हा शिवकाळातील कवी होय. मुक्तेश्वराने महाभारताची रचना केली त्यावेळी महाराष्ट्रात स्वराज्याचे वारे वाहू लागले होते. शिवाजीच्या राजनितीला बहर आला होता. त्याचाही परिणाम मुक्तेश्वराच्या मुक्त प्रतिभेवर झाला असला पाहिजे. हे त्यांच्या महाभारत रचनेवरून दिसून येते. मुक्तेश्वरांनी महाभारतातील पाचपर्वे लिहिली. याशिवाय 'गजेंद्रमोक्ष', 'रामदासवर्णन', 'हरिश्चंद्राख्यान', 'शुकरंभासंवाद', 'मुर्खाची लक्षणे', 'श्री एकनाथ चरित्र', 'संक्षेप रामायण' ही काव्यरचना मुक्तेश्वरांच्या नावे सांगितली आहे. हे काव्य विविध वृत्तात आहे. एकनाथ आणि रामदास या दोन संतांची चरित्रे मुक्तेश्वरांनी लिहिली. यावरून दोन संतांच्या विचाराचा प्रभाव मुक्तेश्वरावर होता असे दिसून येत असले तरी मराठी साहित्यात मुक्तेश्वर त्यांच्या महाभारत रचनेमुळे प्रसिध्द आहेत.

मुक्तेश्वरांनी महाभारताची रचना केली याचा अर्थ महाभारताचे भाषांतरकेले नाही, तर या कथेतील अनेक व्यिक्तचित्रे, प्रसंग यांना जीवंत मराठी रूप दिले मुक्तेश्वरांनी म्हंटल्याप्रमाणे महाभारत म्हणजे मेरूपर्वत होय आणि आपली रचना

म्हणजे त्या मेरूपर्वताचे सोने घेऊन सुंदर सुंदर दागीने बनवून श्रोत्यांना त्यांची भुषणे आपण बनविली आहेत अशी मुक्तेश्वरांची भुमिका आहे. महाभारताचे सभापर्व हे महासभेच्या कथेपासून सुरू होते. 'मय' नावाच्या राक्षसाने श्रीकृष्णाच्या सत्यानुसार अद्भूत अशी मयसभा निर्माण केली. त्या सभेत अनेक मंत्री,विद्वान, ऋषीमुनी, कलाकार बसले असताना नारदाने प्रवेश केला आणि युध्दिष्ठिरास राजनीतीचे विरूपण केले. मयसभेप्रमाणेच इंद्रसभा, ब्रम्हसभा अशा प्रकारच्या पाच सभांचे वर्णन नारदाने केले. याच प्रसंगी पांडवांनी राजसूय यज्ञाचा संकल्प केला. त्याचाच एक भाग म्हणून जरासंधाचा वध केला. चारही दिशेला पांडवांनी विजय प्राप्त केला आणि अतिशय भव्य स्वरूपात राजसूय यज्ञ केला. त्यानंतर व्यासांनी सर्वांना दर्शन दिले. आणि पुढे होणा-या दुर्घटनांची जाणिव करून दिली आणि व्यासांनी म्हंटल्याप्रमाणे त्या घटनाक्रमास सुरूवात झाली. धृतराष्ट्राने पांडवांना द्युत खेळण्यास हस्तिनापुरात पाचारण केले शकुनी, दुर्योधन यांनी कपट द्युत खेळून पांडवांचे सर्वस्व हरण केले. राज्य, संपत्ती, द्रौपदी या सर्वांना पांडवांनी द्युतात पैजेसाठी लावले आणि दुर्दैवाने पांडव हरले. याचप्रसंगी द्रौपदीच्या वस्त्रहरणाने फार मोठा प्रक्षोभ निर्माण झाला त्यानंतर ठरल्याप्रमाणे पांडव वनात निघाले. कारण द्युतात ठरल्याप्रमाणे पांडव वनात निघाले कारण द्युतात ठरल्याप्रमाणे पांडवांना १२ वर्षे वनवास व १ वर्षाचा अज्ञातवास भोगावा लागणार होता. त्यानुसार पांडव द्रौपदीसह वनवासात निघाले पांडवावर झालेल्या अन्यायाबद्दल विदुराकडून धृतराष्ट्राची कानउघाडणी करण्यात आली. पण धृतराष्ट्र अतिशय कपटी होता त्याच्यावर कांहीही परिणाम झाला नाही आणि येथेच सभापर्व संपते.

महर्षि नारदाने जे कच्चित प्रश्न धर्मराजाला विचारले त्यातून महाभारतकालीन राजधर्माचे निरूपण आले आहे. राजाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरूषार्थाच्या सिध्दीसाठी कशाप्रकारे आचार-विचार करावा याचे सुंदर मार्गदर्शन नारदनीतीतून आले आहे. मुक्तेश्वराने महाभारतातील नारदनीतीतील अतिशय महत्वाचा भाग आपल्या विवेचनातून आणला आहे. राजाने कसे वागावे, प्रजेच्या सुखासाठी कोणत्या प्रकारच्या नीतीचा अवलंब करावा राजाने आपल्या राज्यव्यवहारात जे मंत्री, अधिकारी, सेवक नेमले आहेत. त्यांची योग्यता काय असावी? त्यांच्याकडून प्रजेचे कल्याण होण्यासाठी कोणकोणत्या युक्त्यांचा अवलंब करावा. आपल्या पदरी असणा-या अधिका-यावर वचक राहण्यासाठी आपले हेर खाते कसे सक्षम ठेवावे? शत्रुबरोबर वर्तन करताना कोणते धोरण ठेवावे? परकियांचा मुलुख जिंकल्यानंतर तेथील प्रजेचा कसा प्रेमाने परतपाळ करावा? राज्याचे रक्षण

करण्यासाठी अनेक कडेकोट किल्ले राजाने बांधावेत आणि त्या किल्ल्यात धान्य, औषधी, शस्त्रसाठा अस्त्र यांचा साठा कसा ठेवावा? जे युध्दात गतप्राण झाले आहेत त्यांना राजाने तात्काळ मदत द्यावी. त्यांच्या कुटूंबियाची देखभाल करावी अशा अनेक मौलीक गोष्टीवर नारदाने प्रकाश टाकला आहे. नारदनीतीला सामाजिक, राजकीय व धार्मिक पैलू आहेत विशेषत: यातील राजधर्म काही अपवाद वगळल्यास आजच्या राज्यकर्त्यांनाही मार्गदर्शक ठरणार आहे. राजनीतीवर नारदनीतीत सुक्ष्म प्रकाश टाकला आहे. विशेष म्हणजे धर्म आणि राजकारण यांचा परस्पर संबंध कसा असतो? याचे आदर्श उदाहरण राजनीतीत पहावयास मिळते. राजाने धर्मानुसार, द्रव्य मिळवावे आणि धर्मासाठी द्रव्य खर्च करावे. स्त्रीसुख केवळ स्त्रीसुखासाठी भोगू नये तर स्त्रीच्या संगतीत धर्माचे आचरण अपेक्षित आहे. भाग्याने वैभव मिळाले म्हणून उन्मत्त न होता ते आपल्यावर अवलंबुन असणा-या सर्व लोकांना सारखे वाटून टाकावे. राजेलोकांनी काम, क्रोध, लोभ यांचे नियंत्रण कसे करावे याबद्दल सुंदर मार्गदर्शन नारदनीतीत आढळते. परस्त्रीचा काम नसावा सत्पुरूषाचा क्रोध नसावा. शरीराचा लोभ नसावा, स्वत:च्या पुत्राचा मोह नसावा, सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी मत्सर नसावा हे सर्व सांगितल्यानंतर नारदाने ईश्वर भजनात काम (ईच्छा) असावा इंद्रियावर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीत क्रोध असावा, देवाचे तिर्थ-प्रसाद ग्रहण करण्याच्या बाबतीत मद असावा आणि संसारातील शत्रुबद्दल मत्सर असावा याबद्दल नारदनीतीत सुंदर मार्गदर्शन केले आहे. राजाने प्रधानाची नेमणुक करताना तो आज्ञाधारक, किर्तीमान, दानी, मित्रांना संरक्षण देणारा, ब्राम्हणांचे प्रतिपालन करणारा आहे किंवा नाही हे पहावे. तसेच सेनापतीची नेमणूक करताना त्यास निरनिराळया व्युहरचना त्याचबरोबर थोडया सैन्याच्या बळावर शत्रूला जिंकण्याची युक्ती त्याच्याजवळ आहे किंवा नाही हे पहावे. आपल्या पदरी असणारे सेवक निर्लोभी, विश्वासू व राजाच्या जिवासाठी देह अर्पण करणारे आहेत किंवा नाहीत हे पहावे. सेवकांना जो कांही पगार मिळतो त्याव्यतिरिक्त कोणताही पैसा घेणे ते अपवित्र समजातात की पवित्र समजतात हे पहावे. हे धर्मराज राज्याचा व्यवहार चालण्यासाठी जे अधिकारी असतात त्यांची योग्यता पाहूनच त्यांना त्या त्या पदावर नेमावे. अतिशय मोठया पदावर हिंसक प्रवृत्तीचा माणूस नेमू नये किंवा अतिशय लहान पदावर चांगली गुणवत्ता असणा-या श्रेष्ठ व्यक्तीची नेमणुक करू नये. विशेषत: सेनापती, प्रधान व अमात्य पदावर हिनकस लोक नसावेत. अशा त-हेने राजाने आपल्या पदरी जे लोक नेमावयाचे आहेत त्याबद्दल सुक्ष्म मार्गदर्शन नारदनीतीत सांगीतले आहे. राजाचे खाजगी सेवक आणि कोषागारातील

अधिकारी निर्लोभी असावेत. अंतपुरात राजाने क्लिब नेमले आहेत की नाहीत. तसेच पत्रशाळेत काम करणारे लोक खादाड तर नाहीत राजाच्या ठिकाणी चौदा प्रकारचे गुणधर्म असावेत असे म्हटले आहे साम, दंड, भेद, मंत्र, औषध, इंद्रजा, वक्तृत्व, उत्साह, तर्ककुशलता, स्मरणशक्ती, दुरदर्शीत्व, नीतीशास्त्राचे ज्ञान आणि शत्रूचे बलाबल पाहणे हे चौदा गुण राजाच्या अंगी असावेत असे म्हटले आहे. यावरून राजधर्म किती कठोर आहे. याची कल्पना येते. महाभारतानंतर पुढे कौटिल्याने जो अर्थशास्त्र हा राजनीतीपर ग्रंथ लिहिला त्यात महाभारतातील या राजधर्माचा फार मोठा आधार आहे. राजनीतीचे सुक्ष्म बारकावे नारदनीतीतून आले आहे. राज्यव्यवहारात जे अधिकारी, मंत्री, सेनापती, पुरोहित, द्वारपाल, राजदुत, तुरूंगाचे अधिकारी, राजकीय सल्लागार, नगराध्यक्ष, किल्लेदार, राज्याच्या सीमा रक्षण करणारे अधिकारी, न्यायाधीश इत्यादीवर राजाने आपल्या हेरामार्फत करडी नजर ठेवावी इतकेच नव्हे, तर राजपूत्र व राणी व राजाचे आप्तेष्ट यांच्यावर देखील गुप्तहेरांच्या मार्फत राजाने अंकुश ठेवावा असे म्हटले आहे. यावरून प्रजेच्या रक्षणासाठी राजाने कसे सतर्क रहावे याची मार्मीक सुचना नारदनीतीत केली आहे. राजाने अग्नि,सर्प,चोर, वाघ, रोग, राक्षस आणि परचक्र (परकियांचे आक्रमण) यापासून आपले राज्य सुरक्षित ठेवावे. राजाच्या ठिकाणी नास्तिकपणा, खोटेपणा, राग, उतावळेपणा, कामात आळस दिर्घसूत्रीपणा, निर्णय घेण्याची शक्ती नसणे हे दोष नसावेत. राजाने आपल्या वैयक्तिक जीवनात स्त्री पूत्र यांच्याबाबतीत यशस्वी धोरण ठेवावे. याचा अर्थ असा की, स्त्रीपासून आपण आनंद मिळवावा आणि आपल्यामुळे स्त्रीला आनंदव्हावा असे वर्तन असावे. दान देणे व दानांच्या पुण्याच्या भोग घेणे हे धर्माला अनुसरून असल्यामुळे राजाने दानाच्या बाबतीत उदार असावे. कांही गोष्टी राजाने प्रधानास एकांतात सांगाव्या कारण की, त्या गोष्टी लोकात प्रकट होऊ नयेत कारण त्या प्रकट झाल्यास राज्यातील दुष्ट लोक त्याचा फायदा घेऊन राष्ट्रात संकट निर्माण करतील म्हणून प्रधान, अमात्य, सेनापती यांच्याशी एकांतात सल्लामसलत करावी. राजाने जे लोकात बोलावयाचे आहे ते व्यवस्थित बोलावे. परंतु ऐकताना मात्र सुज्ञ व अनुभवी माणसाचे ऐकावे आणि ते मनात ठेवावे राजाने आपल्या हेर खात्याच्या मार्फत शत्रूंच्या हालचालीवर सूक्ष्म लक्ष ठेवावे. कांही हेर फितूर होऊन आपल्याच राजकारणातील रहस्य शत्रूला कळवतात. त्याबाबतीत राजाने सतर्क असावे राज्यातील कर्मचा-यांच्या वेतनाबद्दल कोणतीही कटकट निर्माण होऊ देऊ नये तसे झाल्यास राज्य यंत्रणेला धोका निर्माण होतो. राज्याचे अर्थ लेखापरिक्षक खाते नेहमी चोख ठेवावे.

उत्पन्न कीती व खर्च किती याचा ताळेबंद सतत घेत रहावा.

परदेशातील किमती वस्तू आणून व्यापार करणा-या व्यापा-यांना राजाने संरक्षण दिले पाहिजे. गरज भासल्यास त्यांना व्यापारासाठी द्रव्यही दिले पाहिजे. म्हणजे आपल्या राष्ट्रातील व्यापार वाढेल. थोडक्यात राजकीय दृष्टिकोनातून अनेक महत्वाचे विषय नारनीतीत आले आहेत जे की आजच्या राज्यकर्त्यांनाही मार्गदर्शक ठरतील. नारदनीतीत धर्माचरणाबद्दलही अनेक प्रकराचे निरूपण आले आहे. राजाने धर्माचरणात मुळीच कसर करू नये. नियमित नैमित्तिक कर्माचे आचरण करावे. नेहमी पाप-पुण्याचा विचार करावा. आणि धर्मापासून बुध्दि विचलीत होणार नाही असेच राजाने वर्तन करावे. पुज्य व्यक्तिचा सत्कार करावा राजाने अग्निवेश तसेच प्रसंगानुसार यज्ञ, याग यांची उपासना करावी त्याबरोबर श्रमजीवन धर्मानुसार पूर्ण करावे. शुभ अशुभ याचा ही विचार राजाने करावा सत्पात्री दान करावे. विशेषत: योगी, संत, सत्पुरूष यांना द्रव्यदान करावे. मुनीने त्या धर्माचे नीरूपण केले आहे. त्याप्रमाणे राजाने आपण आचार-विचार ठेवावा. संताची व सज्जनांची निंदा करणा-यांची जिभ तात्काळ कापावी. ज्याप्रमाणे आवडत्या जावायाचा आदर सत्कार आपण प्रेमाने करतो. त्याचप्रमाणे एखाद्या गरीब याचकाचा राजाने सन्मान करावा. राज्यातील ब्राम्हण, मुनी, पारंगत असावेत आपल्या कर्माचरणात दक्ष असावे. त्यांच्याकडून राजाने अनेक याग (यज्ञ) कर्म, यज्ञपुरूषास संतुष्ट करावे कांही विद्वान ब्राम्हणांना उपजिविकेसाठी सनदा द्याव्यात तसेच शनी, मंगळ यासारखे दुष्ट ग्रह प्रतिकूल झाल्यास त्यांची शांती करावी. आपल्या राज्यातील जुन्या मंदिराचा जिर्णोध्दार करावा ठिकठिकाणी विहिरी व तलाव निर्माण करावेत. थोडक्यात नारदनीतीतील राजनीती धर्मावर आधारित आहे अर्थात त्यातील कांही गोष्टी आज कालबाहय ठरतात तथापि राजाने आपले वैयक्तिक जीवन धर्मशील आणि पवित्र ठेवावे. ही गोष्ट आजही आचरणीय आहे.

नारदनीतीला कांही सामाजिक पैलूही आहेत. नारदनीतीत विशेषत: समाजातील शेतकरी, गरीब, दरिद्री वर्गाबद्दल राजाने कोणते धोरण ठेवावे. याबद्दल नारदनीतीत सुंदर मार्गदर्शन केले आहे. शेतकरी जमीन कसतो पण ती कसण्यासाठी त्याच्या जवळ पैसा नसेल, तर राजाने तो पैसा शेतक-यास पुरवावा. चोर, लुटारू यांच्यापासून गोर-गरीबांचे राजाने रक्षण करावे. तिर्थयात्रेला जाणारे लोक लुटारूंची शिकार होतात. तेंव्हा राजाने तिर्थयात्रेला मार्ग बिनधोक करावा. कोणत्याही दुर्बल व गरीब माणसास आपले दु:ख सांगण्यासाठी राजाकडे येण्यास मुळीच आडकाठी नसावी. ज्याप्रमाणे आपल्या शरीरास कुठे मुंगी चावताच लगेच आपला हात तिथे जातो त्याप्रमाणेच समाजातील

दीन व दु:खी लोकांचे दु:ख निवारण करण्यात राजाने तत्पर असावे. अंगावरचा रोम उमटताच ज्याप्रमाणे वेदना झाल्या पाहिजेत. दरिद्री माणसाचे लग्ने होत नसतील तर त्यास मदत करावी. कुणी रोगाने पिडीत असेल आणि कैदेत असेल तर कैदेत असतानाही रोगी माणसाची सुश्रूषा करावी. एखादा भुकेला माणूस घरी आला, तर त्याला पंचामृताचे जेवण द्यावे. किंवा एखादा कर्जबाजारी माणूस कर्ज फेडण्याच्या धास्तीने आत्महत्या करीत असेल, तर राजाने त्यास कर्जमुक्त करावे. भुकेले वृध्द, दीन, रोड, गरीब, दुर्बल यांना पावसाळयात चिखलाच्या मार्गाने जाण्याचे क्लेष होणार नाही याची राजाने काळजी घ्यावी. शेतकरी दारिद्रयाने खंगले असतील तर त्यांना त्याकाळात राजाने धनधान्य द्यावे आणि त्यांचे रक्षण करावे राजकुमार, राजस्त्रिया, सरकारी अधिकारी यांच्याकडून प्रजेचे शोषण होणार नाही याची काळजी घ्यावी. राष्ट्रातील हिंसक आणि हिंसाचार करणारे लोक त्यांचा शब्दही कानावर पडताच पहिल्यांदा त्यांचा वध करावा. व नंतर मग त्यांची चौकशी करावी तसेच राज्यातील आंधळे, भुके, पंगु, शरीरात व्यंग असणारे तसेच संन्याशी यांचा सांभाळ राजाने आपल्या पित्याप्रमाणे करावा. थोडक्यात नादरनीती म्हणजे केवळ राजनीतीचे निरूपण नाही तर कळवळा व गरीबांच्या दु:खाविषयी जाणीव असणा-या राजधर्माचे निरूपण नारदनीतीत आले आहे. अशा त-हेने राजाने सर्व गोष्टिविषयी समाधान असावे आणि चारही वर्णांचे संरक्षण करावे. राज्य भोगून मृत्यूनंतर इंद्रपद प्राप्त करावे. अशा प्रकारे नारदाने धर्मराजास सुचना केली आहे. मुक्तेश्वरकृत नारदनीतीत शिवकालीन समाजमनाचे व राष्ट्रीय आकाशाचे प्रतिबिंब उमटले आहे. उदा. शेतकरी, गोर-गरीब, दु:खी यांचा कळवळा महाराजांच्या राजनीतीत आढळतो. शिवाजीचे राजकीय धोरण नेमके काय? कसे होते? हे आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्य यांनी कथन केले आहे. नारदनीतीतील अनेक दृश्ये शिवाजीच्या व्यक्तिमत्वाची आठवण करून देतात. जसे समाजातील साधु-संत याबद्दल शिवाजीचे अंत:करण मृदू होते पण दुष्ट, दुर्जन व पापी याबद्दल शिवाजी अतिशय कठोर होता. नारदनीतीतही राजाने कसे नम्र असावे व दुष्ट दुर्जनाबद्दल निष्ठूर असावे याचे कथन केले आहे. स्त्रीचा उपभोग धर्मानुसार करावा हे नारदनीतीत आपण जेंव्हा वाचतो. तेंव्हा शिवाजीचेच चित्र आपल्या डोळयासमोर उभे राहते. मंत्री, सेनापती, अमात्य याविषयी राजाचे धोरण व नादरनीतीतील उपदेश यात विलक्षण साम्य आहे. अप्रत्यक्ष शिवाजीचेच चित्र कवी रेखाटत आहे असे नारदनीतिवरून दिसून येते. तोंडाने लोकांना ब्रम्हज्ञान सांगणारे आणि प्रत्यक्षात मात्र अविचारी वर्तन करणारे जे ढोंगी लोक आहेत त्यांच्यापासून राजाने सावध रहावे. वर-वर आपण योगी पुरूष

आहेत असे भासवतात व प्रत्यक्षात मात्र स्त्री व द्रव्य यांचा खुशाल उपभोग घेतात. अशा ढोंग्यापासून राजाने सावध रहावे. ही नारदाने केलेली सूचना शिवकाळातील ढोंगी लोकांना तंतोतंत लागू आहे. आई-वडीलांना घराबाहेर काढून सासूरवाडीच्या लोकांना घरात ठेवणा-या लोकांचा फटकार नारदाने केला आहे. असे चित्र तुझ्या राज्यात तर नाही ना हा नारदाचा प्रश्न शिवकालीन समाजनीतीशी निगडीत आहे अशा त-हेने नारदनीतीत समकालीन परिस्थितीचे प्रतिबिंब उमटले आहे. विशेष म्हणजे शिवाजीच्या राजनीतीशी नारदनीतीचे अनेक ठिकाणी साम्य आढळते. ही गोष्ट उल्लेखनीय आहे. धर्म व राजकारण यांचा परस्परसंबंध कसा असावा हे ही आजच्या राज्यकर्त्यांनी नारदनीतीतून शिकण्यासारखे आहे. महाभारताचा काळ संपून कित्येक युगे लोटली असली तरी तेंव्हा कथन केलेली राजनीती आजच्या लोकशाहीस अनेक बाबतीत योग्य व आदर्श वाटतात मुक्तेश्वराने महाभारतातील आलेल्या कच्चित प्रश्नांना सुबोध मराठी परिवेश दिला. समर्थ रामदासांनी दासबोधात ज्या सुबोध शैलीतून राजकारण निरूपण केले त्याच सुबोध शैलीची आठवण ही नारदनीती वाचताना होते.

**संदर्भग्रंथ :-**


१) अ. ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास' भाग चौथा, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७७
२) प्र. न. जोशी, 'प्राचीन मराठी वाड्मयाचा विवेचक इतिहास' प्रसाद प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती, १९७८
३) ल. रा. नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर सहावी आवृत्ती, १९९७
४) शिवाजी गऊळकर, 'प्राचीन मराठी आख्याक कविता: उद्‌गम आणि विकास' निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २०००.
५) मुक्तेश्वरकृत, 'महाभारत सभापर्व', वामन दाजी ओक, पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे, वर्ष १९२७